


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ६ जानेवारी २०२५ | अंक२८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# १४ जूनला धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर नेमकं काय घडलं?

## त्या बैठकीबाबत सुरेश धस यांचा मोठा गौप्यस्फोट,

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या घटनेनं राज्यात चांगलीच खळबळ उडाली, संतोष देशमुख हत्याप्रकरणात सुरुवातीपासूनच आमदार सुरेश धस यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आता पुन्हा एकदा त्यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. आज पुण्यात संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी आक्रोश मार्चा काढण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

नेमकं काय म्हणाले सुरेश धस? १४ जून रोजी वाल्मिक कराड, बिक्कड आणि शुक्ला यांची धनंजय मुंडे यांच्या



बंगल्यावर बैठक झाली. जोशी नावाचे जे मुंडे यांचे पी ए आहेत त्यांच्या मार्फत कंपनीशी संधान साधण्याचा प्रयत्न झाला. वाल्मिक कराड यांनी बिक्कड यांना सांगून दुस-या कंपनीचं काम बंद पाडलं. १९ जून रोजी सातपुडा या बंगल्यावर बैठक झाली, ३ कोटी रुपयांची मागणी झाली नंतर कंपनी दोन कोटी रुपयांना राजी झाली. ओम साई राम या कंपनीच्या नावावर सिक्युरिटी देण्यात आली. नितीन बिक्कड याला उचललं तर ब-याच गोष्टी बाहेर येतील, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की, संतोष देशमुख यांचा मर्डर केला गेला, नितीन कुलकर्णी हा वाल्मीकचा पीए आहे तो १७ मोबाईल वापरतो, त्यातून सगळे सिक्रेट बाहेर येतील. मी याबाबत ईडी अधिका-यांना, देशाचे गृहमंत्री, मुख्यमंत्री यांना पत्र लिहिणार आहे. पोलिसांना सुद्धा सह आरोपी करा, जे वाल्मीकचे बॉडीगार्ड आहेत, त्यांना सुद्धा आरोपी करा, अशी मागणी यावेळी सुरेश धस यांनी केली आहे.दरम्यान दुसरीकडे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी देखील यावेली बोलताना जोरदार हल्लाबोल केला आहे. नऊ तारखेला अपहरण करून संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली, हा मोर्चा कुठल्याही पक्षाचा, जातीचा नाही. संतोष देशमुख यांच्या मारेक-यांना फाशी झाली पाहिजे. जोपर्यंत फाशी होत नाही तोपर्यंत मोर्चा सुरूच राहणार असा इशारा बजरंग सोनवणे यांनी दिला आहे.

## आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घेतली नाईक कुटुंबीयांची सांत्वनपर भेट



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट माहूर मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार स्वर्गीय प्रदीप नाईक यांचे १-जानेवारी रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.यांच्या निधनानंतर दि.४-जानेवारी रोजी लोहा कंधार मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दहेली तांडा येथे नाईक परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.यावेळी वसंत सुगावे,माधव पावडे ,जीवन पाटील घोगरे,वैजनाथ करपुडे पाटील,प्रफुल राठोड आदी उपस्थित होते

## खा.शरद पवार आज घेणार दहेली तांडा येथे नाईक कुटुंबियाची सांत्वनपर भेट



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट राष्ट्रवादी पार्टीचे अध्यक्ष खा.शरद पवार हे आज दि.६ रोजी नांदेड दौ-यावर येत आहेत. या दौ-यात खा. पवार किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथे राष्ट्रवादीचे माजी आमदार स्व.प्रदिप नाईक यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार आहेत. मुंबई विमानतळावरून खा. शरद पवार निघणार असून सकाळी ८.४५ वा. नांदेड विमानतळावर पोहचतील. येथे काही वेळ थांबून १० वा. हेलिकॉप्टरने माहूर येथे पोहचतील. तेथून १०.३५ वा. खासगी वाहनाने दहेली तांडा येथे ११.०५ वा. पोहचणार आहेत. राष्ट्रवादीचे माजी आमदार स्व. प्रदिप नाईक यांच्या कुटुंबियांची खा.पवार सांत्वनपर भेट घेणार आहेत. यानंतर नांदेड विमानतळावरून दुपारी २ वा. विमानाने मुंबईकडे रवाना होणार आहेत.

## पोलीस दलातील चार अधिकाऱ्यांच्या बदल्या

संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाच्या तपासा दरम्यान पोलीस दलावर वेगवेगळे आरोप होत असताना, आता पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी चार अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत.यात संतोष देशमुख हत्या प्रकरणात सक्तीच्या रजेवर पाठवलेल्या प्रशांत महाजन यांचाही समावेश आहे. त्यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. ते केज पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत होते. संतोष देशमुख हत्या प्रकरण उघडकीस आल्यानंतर त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं होतं. आता पोलीस निरीक्षक वैभव पाटील हे केज पोलीस स्टेशनचे प्रभारी म्हणून काम पाहणार आहेत. पोलीस निरीक्षक सय्यद मजहर अली अबू तालीब हे नियंत्रण कक्षातून आता परळी ग्रामीण पोलीस स्टेशनचा पदभार घेणार आहेत. तर पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे यांची केज पोलीस स्टेशनमध्ये बदली करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी ही मोहीम राबवली आहे

## ऋषभ पंतने वादळी अर्धशतकासह घडवला इतिहास

ऑस्ट्रेलिया : भारतऑस्ट्रेलिया सिडनी कसोटीत ऋषभ पंतचा जलवा पाहायला मिळाला. ऋषभ पंतने पहिल्याच चेंडूपासून आक्रमक खेळी करत ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांची शाळा घेतली. दुसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात ऋषभ पंतची तुफानी फलंदाजी पुन्हा एकदा पाहायला मिळाली. पहिल्या चेंडूवर येताच पंतने स्कॉट बोलॅंडला षटकार ठोकला. यानंतरही पंत इथेच थांबला नाही, त्याने प्रत्येक ऑस्ट्रेलियन गोलंदाजाला चोप दिला. दुसऱ्या डावात पंतने अवघ्या २९ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. या अर्धशतकासह त्याने नवा विक्रम रचला आहे. सिडनी कसोटीच्या दुसऱ्या डावात ऋषभ पंतने वादळी फलंदाजी करत अवघ्या २९ चेंडूत अर्धशतक झळकावले. आता पंत ऑस्ट्रेलियात सर्वात जलद कसोटी अर्धशतक करणारा प्रतिस्पर्धी संघाचा पहिलाच फलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम इंग्लंडच्या जॉन ब्राउन आणि वेस्ट इंडिजच्या रॉय फ्रेडरिक्स यांच्या नावावर होता,

## खोटे कागदपत्र दाखल करून भुखंड हडपण्याचा प्रयत्न

बीड(प्रतिनिधी):- भाड्याने दिलेली जागा बळकावण्यासाठी गेवराई येथील अ.हन्नान मं.युसुफोद्दिन यांनी खोटा अर्ज गेवराई बाजार समितीकडे दाखल करून सदरील जागा हडपण्याचा प्रयत्न केला. मात्र हा बनाव मयताच्या मुलाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत न्यायालयात अर्ज दाखल केला होता. न्यायालयात साक्ष पुरावे समोर आल्यानंतर न्यायालयाने आरोपी विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. गेवराई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीने शेख खुदस शेख इस्माईल (रा. मादळमोही) यांना एक भुखंड भाड्याने दिला होता. त्यांनी त्या जागेवर बरेच वर्षे व्यवसाय चालविला परंतु त्यांचे नातेवाईक असलेले अब्दुल हन्नान मोहंमद युसूफोद्दीन यांनी शेख खुद्दूस यांच्यानावाने स्वतः अर्ज लिहून व शेख खुदूस यांची स्वतः सही करून सदर भुखंड परत करण्याचा खोटा व बनावट अर्ज कृषी उत्पन्न बाजार समितीत दिला व त्याच दिवशी स्वतःला भुखंड मिळण्याच्या मागणीचा अर्ज सुध्दा दिला. त्यानंतर शेख खुद्स हे आजारी पडल्यानंतर मयत झाले. वडीलांच्या जागेचे काय झाले याचा शोध त्यांचा मुलगा शेख सिद्दीकी शेख खुदुस याने घेण्याचा प्रयत्न केला. त्याने खरेदी विक्री संघातून कागदपत्रे काढल्यानंतर आपल्या वडीलांच्या नावे खोट्या सहीचा अर्ज दिला असल्याचे आढळुन आल्याने त्यांनी फौजदारी न्यायालय गेवराई येथे प्रसिध्द विधीतज्ञ ॲड. सुभाष निकम यांच्या मार्फत अब्दुल हन्नान युसूफोदीन यांच्या विरुद्ध केस दाखल केली.

## स्व स्वरूप संप्रदाय , नानिज यांच्या वतीने उद्या दिनांक ७ जानेवारी ला पाटोदा येथे भव्य रक्तदान शिबीर आयोजित

पाटोदा प्रतिनिधी :-

जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थ-ांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ७ जानेवारी रोजी रक्तदान महायज्ञाचे पाटोदा येथे आयोजन करण्यात आले आहे या शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन तालुका अध्यक्ष श्री पवार बी के व जिल्हा शिबीर प्रमुख श्री रामकृष्ण सानप यांनी केले

जिल्हा रुग्णालय पाटोदा या ठिकाणी या महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबीर आयोजित केलेल्या कार्यक्रमात पाटोदा तालुक्यातील युवा,युवती व महिला पुरुष बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आव्हान स्व स्वरूप संप्रदाय तालुका सेवा समितीचे श्री भगवान पवार, (ता .अध्यक्ष) अनिता भोगल (महिला ता.अध्यक्ष) गोतम पंडित ( ता. सचिव ) गोकुळ ढेरे ,रावसाहेब काळे, भारत लोखंडे, मुक्ता मंडलिक ,अतुल कदम, नाना आवटे ,हनुमंत सकुंडे, विनोद कदम, पांडुरंग ढेरे, अशोक तनपुरे ,दादा सोंडगे , काळे सर ,शोभाताई साळुंखे व तालुका कार्यवाहक, सुर्यकांत जगताप व सेवा केंद्र निरगुडी, पाटोदा, डोंगरकिन्ही, शिखरवाडी, बेंनसुर ढाळेवाडी ,लिंबादेवी ,भाटेवाडी ,पारनेर , सौंदाना, मंगेवाडी, गांधणवाडी वैजाळा ,पिंपळवाडी ,पाचेगाव या सेवाकेंद्राच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे . ९३५९००९८९७ म ८८०१०५०९०९ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा हे आव्हान करण्यात आले आहे .




# अ. भा.मराठा महासंघ न्यायाच्या लढाईत शेवट पर्यंत स्व. संतोष देशमुख कुटूंबाच्या सोबत.

## दिलीप दादा जगताप अध्यक्ष मराठा महासंघ



संपूर्ण महाराष्ट्राला हळहळून सोडणारे, माणुसकीला काळिमा फसणारी घटना म्हणजेच बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्याकांड अत्यंत क्रूर व निष्ठुरपणे घडवण्यात आलेल्या या हत्याकांडाने समाजमन दुखावले गेले, देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या कठीण समयी देशमुख कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती ईश्वर त्यांना प्रदान करो देशमुख कुटुंबीयांना मानसिक आधार देण्यासाठी मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप दादा जगताप व त्यांचे महाराष्ट्रातील सहकारी यांनी आज मस्साजोग येथे देशमुख कुटुंबीयांची सांत्वन भेट घेतली यावेळी स्व. देशमुख यांचे बंधू धनंजय, व त्यांचे वडील पंडितराव यांच्याशी चर्चा करत अखिल भारतीय मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य सदैव आपल्या सोबत असून लवकरच एक शिष्टमंडळ घेऊन मुख्यमंत्री तथा दोन्ही उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे यासाठी प्रयत्न करणार तसेच कायद्यात निष्णात असणारे असणारे कायदे तज्ञ वकील मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची कळवले स्व. देशमुख यांच्या मातोश्री, मुलांना भेटल्यावर मराठा महासंघाच्या अनेक पदाधिकारीही भावनिक सुन्न झाल्याचे पाहण्यास मिळाले या सांत्वन भेटीस मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप जगताप, ठाणे जिल्हाप्रमुख अविनाश राणे, महा मुंबई सरचिटणीस महेश सावंत, मुंबई अध्यक्ष बाळ लाड, खजिनदार अनंत मोरे, कार्यकारणी सदस्य माधवराव पाटील, दिंडोशी विधानसभा अध्यक्ष, राजेश सकपाळ, रत्नागिरी संपर्कप्रमुख विवेक कदम, सातारा संपर्कप्रमुख मारुती निकम, ज्येष्ठ समाजसेवक पंजाबराव मस्के पाटील, अध्यात्मिक आघाडीचे बब्रुवान शेंडगे बीड जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे,बीड ता. अध्यक्ष अविनाश घिगे, युवराज मातकर, आकाश नाईकवाडे, बंटी देशमुख, नितीन नाईकवाडे, सह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते

## सं पा द की य

### वर्ष नवे, हवेत प्रयत्न नवे!

सरत्या वर्षात सरकारच्या वतीने जनतेला भावतील अशा अनेक नवीन घोषणा करण्यात आल्या, तर काही जुन्या घोषणांची उजळणी पुन्हा एकदा करण्यात आली. सरत्या वर्षात फेब्रुवारी मध्ये विजेवरील ५१५० नवीन भाडेतत्त्वावरील गाड्या घेण्याची घोषणा करण्यात आली, ठाण्यात त्याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले व दर महिन्याला सुमारे २१५ गाड्या येणार असेही या वेळी जाहीर केले. पण त्या पैकी फक्त १६८ बस सरत्या वर्षात एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. राज्याच्या सर्वांगीण विकासात सर्वांत मोठा वाटा असलेल्या व राज्याची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीला खर्चाला आजही दररोज दोन कोटी रुपयांची तूट येत असल्याचे महामंडळानेच सरत्या वर्षाच्या शेवटच्या आठवड्यात स्वतः कबूल केले आहे. सरकारने प्रवाशांसाठी विविध प्रकारच्या सवलती व नवनवीन योजना जाहीर करून फक्त लोकप्रियता मिळविण्यासाठी एसटीचा वापर केला. मात्र यातील अनेक घोषणा अखेर फक्त आणि फक्त आश्वासन ठरल्या. प्रवाशी अथवा कर्मचारी या पैकी कुणाच्याही हाताला फारसे काहीही लागलेले दिसत नाही. ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास व स्त्रियांना अर्ध्या तिकीट दरात सवलतीचा प्रवास या दोन योजनांचा फायदा या दोन्ही लाभार्थींना मिळाला. पण त्यांना चांगला व सुखकर प्रवास करायला गाड्या मिळाल्या नाहीत, हेही वास्तव स्वीकारले पाहिजे. या दोन सवलतींच्या व्यतिरिक्त एसटीच्या ताफ्यात ना नवीन गाड्या आल्या, ना कामगारांना त्यांची प्रलंबित देणी मिळाली! सरत्या वर्षाचा एकंदर लेखाजोखा पाहिला तर एसटीसाठी हे वर्ष खडतर ठरले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सरत्या वर्षात सरकारच्या वतीने जनतेला भावतील अशा अनेक नवीन घोषणा करण्यात आल्या, तर काही जुन्या घोषणांची उजळणी पुन्हा एकदा करण्यात आली. सरत्या वर्षात फेब्रुवारी मध्ये विजेवरील ५१५० नवीन भाडेतत्त्वावरील गाड्या घेण्याची घोषणा करण्यात आली, ठाण्यात त्याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले व दर महिन्याला सुमारे २१५ गाड्या येणार असेही या वेळी जाहीर केले. पण त्या पैकी फक्त १६८ बस सरत्या वर्षात एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. त्यानंतर ठरल्याप्रमाणे साधारण २००० पेक्षा जास्त गाड्या येणे अपेक्षित होते, पण तसे झाले नाही व ही घोषणा फोल ठरली. सध्या एसटीच्या ताफ्यात आलेल्या भाडेतत्त्वावरील विजेवरील गाड्यांमध्ये दर महिन्याला सुमारे २० ते २५ रुपये प्रति किलोमीटर इतका तोटा सहन करावा लागत आहे. हा चुकीचा करार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. कारवाई करण्यात येईल, असे फक्त आश्वासन देण्यात आले. त्यानंतर खूप आवाज उठविल्यावर कराराचा भंग करणाऱ्या कंपनीला १४ कोटींचा दंड आकारून प्रकरण मिटविण्यात आले, असा दावा करण्यात येत आहे. त्याचीही प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली दिसत नाही. दंड आकारून प्रश्न सुटणार नाही कारण प्रवाशांची गैरसोय झाली. त्यातून कमी का असेना, पण एसटीला मिळणारे उत्पन्न बुडाले याला जबाबदार कोण, हा प्रश्न अनुत्तरित आहे. त्यामुळे पुढे काय करता येईल किंवा हा प्रकल्प रद्द करून तेवढ्याच स्वमालकीच्या नवीन गाड्या घेता येतील का, असा विचारही करण्यात आलेला नाही. हे एसटी प्रशासन व सरकार या दोघांचेही अपयश आहे. याशिवाय दोन वर्षांपूर्वी एसटीच्या स्वमालकीच्या नवीन बॉडी बांधलेल्या तयार गाड्या घेण्याची घोषणा करण्यात आली. त्यासाठी सरकारकडून ९१२ कोटी रुपयांच्या निधीची बजेटमध्ये तरतूद करण्यात आली पण प्रत्यक्ष निधी उपलब्ध करून देण्यात सरकारने उशीर लावला. फाइल सरकारदरबारी अनेक महिने पडून राहिली व साहजिकच त्यामुळे त्यापैकी एकही गाडी ताफ्यात दाखल झालेली नाही. आता त्यातील जानेवारी २०२५ मध्ये काही गाड्या येतील, असे सांगितले जात आहे. नवीन वर्षांत तरी या गाड्या येतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. या शिवाय बहुचर्चित द्रवरूप वायूवर चालणाऱ्या म्हणजेच एलएनजीवर चालणाऱ्या ५००० गाड्या घेण्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली. तसा करारही फेब्रुवारी २०२४मध्ये करण्यात आला, पण या प्रकल्पात कुठलीही प्रगती झाली नसून या प्रकल्पाला एसटी प्रशासन सहकार्य करीत नसल्याची तक्रार सदरचे काम घेणाऱ्या कंपनीने चक्क राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन केली आहे. एलएनजीवरील प्रकल्प हा एसटीमध्ये पहिल्यांदा राबविण्यात येत आहे. देशात अजून कुठेही असा प्रकल्प राबविण्यात आलेला नाही. यामध्ये डिझेलच्या तुलनेत प्रतिकिलोमीटर २० रुपये ५० पैसे इतका खर्च कमी येईल, असाही दावा करण्यात आला. जुन्या झालेल्या गाड्यांवर एलएनजीवरील इंजिन बसविण्यात येणार असल्याने यावर खर्च कमी होऊन प्रतिवाहन नवीन बॉडी बांधणीसह फक्त १९ लाख रुपये इतका खर्च येईल असेही सांगण्यात येत आहे. वरवर पाहता हा प्रकल्प चांगला दिसत असला तरी हा प्रयोग देशात पहिल्यांदा होत असून तो खरोखरच यशस्वी ठरेल का व या गाड्यासुद्धा वेळेत येतील का, हे काळच ठरवेल. याशिवाय नागपूर हिवाळी अधिवेशनात महामंडळाकडून पुरवणी मागण्यात सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कमेत १५०० कोटी रुपये वाढ मिळावी, यासाठी प्रस्ताव पाठवला होता, पण त्यातून महामंडळाच्या हाती काहीही लागलेले नाही. कर्मचाऱ्यांना मध्यंतरी सरकारने ६५०० रुपयांची सरसकट वेतनवाढ केली होती. त्याचा एप्रिल, २०२० पासूनचा फरक देण्यासाठी ३१०० कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. त्याचप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा जानेवारी, २०२४ पासूनचा अंदाजे १०० कोटी रुपये महागाई भत्ता प्रलंबित आहे.

# हिमालयात बर्फ न टिकण्याचे नवे संकट

ओम पर्वत, बद्रीनाथ आणि केदारनाथ यांसह मध्य हिमालयाच्या उंच टेकड्यांवर नोव्हेंबरपासून बर्फवृष्टी सुरू होते. यंदा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बर्फवृष्टी सुरू झाली आहे; पण उंच टेकड्यांवर हा बर्फ जास्त काळ राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे वैज्ञानिक चिंतित असून हिमालयीन प्रदेशासह मोठ्या नद्यांच्या पाणलोट आणि लाभक्षेत्रात जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ईशान्येचा भाग वगळता उर्वरित हिमालयीन प्रदेशात या वर्षी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि पाऊस कमी झाला तर बर्फ कमी पडेल. त्याचा हिमालयाशी संबंधित पाच देशांवर व्यापक प्रभाव पडतो. कारण हिमालय हा आशियाचा जल स्तंभ असण्याबरोबरच या खंडाचा हवामान नियंत्रकदेखील आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते उत्तर आणि उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतेक भागात पूर्व आणि ईशान्य भारताच्या काही भागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. येत्या काळात दक्षिण भारतातील द्वीपकल्पीय भागात सामान्यपेक्षा १२१ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक महासागरात तटस्थ ङ्गअल निनोफ परिस्थिती आहे, तर ङ्गला निनाफ परिस्थिती आणखी विकसित होऊ शकते. त्यामुळे भारतीय हवामानावर परिणाम होऊ शकतो. कमी पावसामुळे, हिमालयातील उंच शिखरे आणि खोऱ्यांना बर्फाऐवजी हलका पाऊस किंवा कोरड्या हवामानाचा सामना करावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, हिमालयात कमी पाऊस आणि कमी बर्फवृष्टीची मुख्य कारणे म्हणजे जागतिक हवामानबदल, ङ्गअल निनोफचा प्रभाव, वातावरणातील दाब आणि मानवी क्रियाकलापांतील बदल. वातावरणातील दाबाच्या नमुन्यातील बदलांमुळे उत्तर-पश्चिमी वारे हिमालयाच्या वरच्या भागात पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पाऊस आणि बर्फवृष्टी कमी होऊ शकते. जागतिक हवामानबदलामुळे तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम बर्फवृष्टीच्या प्रक्रियेवर होतो. उष्णता वाढली की बर्फाऐवजी पाऊस अधिक पडू लागतो. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या हवामान चक्रात नैसर्गिक बदल आहेत, जसे की आंतरमॉन्सून आणि मॉन्सून ब्रेक्स. त्यामुळे हिमालयाच्या प्रदेशात कमी पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. कमी हिमवर्षाव म्हणजे बर्फ वितळणे. त्याचा थेट परिणाम नद्यांच्या जलपातळीवर होतो. यामुळे पाण्याचे संकट उद्भवू शकते. त्याचा परिणाम शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांवर होतो. गंगा, यमुना, सतलज, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा या ग्लेशियरवर आधारित नद्या भारतीय उपखंडासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण या नद्या केवळ पाणीपुरवठ्याचे प्रमुख स्त्रोत नसून शेती, उद्योग, वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्यामध्येही मोठी भूमिका बजावतात. वाढत्या उष्णतेमुळे मॉन्सूनची दिशा आणि स्वरूप बदलू शकते. त्यामुळे असामान्य पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमालयातील बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्यात घट होऊ शकते. रब्बी आणि खरीप पिकांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. हिमालयीन प्रदेशात स्कीइंग, ट्रेकिंग आणि बर्फावर आधारित इतर पर्यटन उपक्रम खूप प्रसिद्ध आहेत. बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे या क्रियाकलापांचे आकर्षण कमी होऊ शकते. त्याचा पर्यटन उद्योगावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार आणि आर्थिक क्रियाकलापांवर होऊ शकतो. या स्थितीत हिमालयातील हवेचा दाब आणि वायुगतीकीमध्ये बदल होऊ शकतो. यामुळे वायू प्रदूषणाची पातळी वाढून श्वसनाचे आजार आणि आरोग्य समस्या उद्भवू शकतात. हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. अतिउष्णतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत सरकार आणि सामान्य जनतेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी अगोदरच तयार राहणे आवश्यक आहे. खास रचनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ओम पर्वतावरील बर्फापासून बनवलेला ओमचा आकार काढून टाकण्यात आला. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात हा बर्फ गायब झाला. शास्त्रज्ञांच्या मते ओम पर्वत भारत, चीन आणि नेपाळच्या सीमेवर स्थित आहे आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ५९०० मीटर उंचीवर आहे. हा पर्वत कैलास मानसरोवर यात्रेतही महत्त्वाचा थांबा आहे. चीनच्या सीमेला लागून असलेल्या लिपुलेखपर्यंतचा रस्ता तयार झाल्यानंतर येथील पर्यटकांची संख्याही वाढली. अल्मोडा येथील ङ्गसेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल असेसमेंट अँड क्लायमेट चेंज सेंटरफचे जे. सी. कुनियाल यांच्या म्हणण्यानुसार, जगभरात हंगामी बदल दिसून येत आहे. ओम पर्वतावरही हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. जागतिक तापमान वाढत आहे आणि त्याचा सर्वाधिक परिणाम हिमनद्यांवर होत आहे. जंगलाला आग लागण्याच्या घटना आणि त्याची व्याप्ती वाढत आहे, हे विशेष. जंगलातील आगीतून निघणारा काळा कार्बन हिमनद्यांवर परिणाम करतो. हिमनदीच्या चांगल्या आरोग्यासाठी त्याच्या खाली असलेल्या झुडपांमध्ये चांगले गवत असावे. अल्पाइन प्रदेशातील जंगलांचे आरोग्य चांगले असावे. या सगळ्यामुळे तापमान संतुलित राहते. या सगळ्याकडे एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांनी आधीच इशारा दिला आहे. २०२२ च्या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, हिमालयातील एक तृतीयांश हिमनद्याला ङ्गग्लोबल वार्मिंगफचा धोका आहे. वाढत्या तापमानामुळे २००० पासून हिमनदी वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्लेशियर्स दरवर्षी ५८ अब्ज टन बर्फ गमावत आहेत. हे फ्रान्स आणि स्पेनच्या एकूण पाण्याच्या वापराच्या बरोबरीचे आहे. ङ्गद इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटन डेव्हलपमेंटफच्या मते हिंदुकुश हिमालयीन प्रदेशात तापमान वाढीचा दर जागतिक दरापेक्षा खूप जास्त आहे. २०२३-२४ च्या हिवाळ्यात संपूर्ण प्रदेशात विक्रमी कमी हिमवृष्टी झाली. विशेषतः पश्चिम हिमालयात फार कमी हिमवर्षाव झाला. २०२३ च्या भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी मॉन्सूननंतर उत्तराखंडमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तापमानात दोन अंशांपेक्षा जास्त बदल झाला होता. याशिवाय हिवाळ्यानंतर पावसाचे प्रमाण खूपच कमी होते. या वर्षी उत्तराखंडच्या मैदानी आणि डोंगराळ भागात भीषण उष्मा होता. डेहराडूनमध्ये तापमान ४४ अंशांवर पोहोचले आहे. ग्लेशियोलॉजिस्ट डॉ. अनिल देशमुख यांच्या मते, देशाच्या इतर भागांच्या तुलनेत हिमालयात तापमान अधिक वेगाने वाढत आहे. याला एलिव्हेटेड इफेक्ट म्हणतात. जसजशी उंची वाढते तसतसे तापमानही वाढते. त्यामुळे, हंगामी बर्फ आता उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात आणि वसंत ऋतूमध्ये वेगाने वितळत आहे. ओम पर्वतावरील बर्फ गायब होणे हा त्याचा पुरावा आहे. गेल्या ३० ते ४० वर्षांच्या मूल्यांकनावरून असे दिसून येते, की बर्फवृष्टीचे प्रमाण कमी होत आहे आणि पावसाचे प्रमाण वाढत आहे. कमी बर्फ आणि वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वितळत आहेत. गढवाल विद्यापीठाचे प्राध्यापक आणि हिमनदी शास्त्रज्ञ एचसी नैनवाल यांनी सांगितले, की हवामानातील बदल आणि ङ्गग्लोबल वॉर्मिंगफमुळे हिमवर्षाव कमी होत आहे. हिमनद्यांमध्ये बर्फ साचू शकत नाही, हे भविष्यातील जलसंकटाचे लक्षण आहे. हिमालयीन प्रदेश हिमवर्षाव नसलेले दिसतात. नैनवाल म्हणतात की, हिमवर्षाव नसणे ही चिंतेची बाब आहे;

# सुजयच्या बोलण्याने साई भक्तांच्या भावना दुखावल्या हे मान्य, राधाकृष्ण विखे पाटील यांचं स्पष्टीकरण

साई संस्थानच्या प्रसादालयातील मोफत भोजनावरून विखे पिता-पुत्रांनी वेगवेगळी भूमिका व्यक्त केली आहे. भाजपचे माजी खासदार सुजय विखे म्हणतात, मोफत भोजन बंद करून साईभक्तांकडून शुल्क आकारा. तर वडील मंत्री राधाकृष्ण विखे म्हणताय, साईभक्तांना प्रसाद भोजन निःशुल्क सुरूच राहील. मात्र सुजय विखेंच्या वक्तव्याचा विपर्यास केल्याचंदेखील राधाकृष्ण विखे पाटील यावेळी स्पष्ट करतात. शिर्डीत भिक्षेक-्यांचा प्रश्न गंभीर आहे. त्या अनुषंगाने सुजयचे वक्तव्य आहे, असं राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले. सुजय विखे पाटील काय म्हणाले?साई संस्थानच्या प्रसादालयातील मोफत जेवण बंद करा. जे पैसे अन्नदानात जातात ते पैसे आमच्या मुलांच्या आणि मुलींच्या भविष्यासाठी, शिक्षणासाठी खर्च करा. अख्खा देश इथे येऊन फुकट जेवण



करतोय. महाराष्ट्रातील सगळे भिकारी इथे गोळा झाले आहेत. हे योग्य नाही. या विरोधात आंदोलनाची वेळ आली तर आम्ही आंदोलन करू. शिर्डीत कोट्यवधी रुपये खर्च करून शैक्षणिक संकुल उभारण्यात आलं. मात्र तिथे चांगले शिक्षक नाहीत. इंग्लिश विषय शिकवणा-्यालाच इंग्रजी येत नाही. इंग्लिश विषयाचा शिक्षक मराठीत इंग्लिश शिकवतोय. याचा काय उपयोग?, असं वक्तव्य सुजय विखे पाटील यांनी केलं.मंत्री राधाकृष्ण विखे पाटील काय म्हणाले?सुजय विखे यांच्या शब्दाचा विपर्यास केला गेला. भिक्षेक-्यांचा अवमान करण्याचा त्यांचा हेतू नव्हता. मात्र मध्यंतरी भिक्षेक-्यांचा प्रश्न फार गंभीर झाला होता. स्थानिक ग्रामस्थांना आंदोलन करावे लागले. सुजय विखेंनी जो शब्द वापरला त्यामुळे भावना दुखावल्या असतील. हे मी मान्य करतो. मात्र भावना दुखावण्याचा त्यांचा हेतू नव्हताङ्ग, असं राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले. ङ्गभिक्षेकरी आणि साईभक्त यांच्यात अनेकदा वाद होऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे याबाबत काहीतरी नियमावली तयार व्हावी, अशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. शिर्डीत येणा-्या साईभक्तांना प्रसाद भोजन मोफत मिळाले पाहिजे. शुल्क आकारण्याची आवश्यकता नाही. साईभक्तांच्या देणगीतूनच महाप्रसाद दिला जातो. तो निरंतर चालू राहीलङ्ग, असं मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्पष्ट केलं. वडिलांच्या वक्तव्यावर सुजय विखे काय म्हणाले?वडिलांच्या वक्तव्यानंतर सुजय विखे पाटील यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. ङ्गमी माझ्या वक्तव्याशी ठाम राहणार. या वक्तव्याने कुठल्याही साईभक्ताला हिणवण्याचं कारण नाही. मराठी भाषेमध्ये प्रत्येक जण वेगवेगळे अर्थ काढतो. मागील ३ वर्षात ४००० हजार भिका-यांना पोलिसांनी अटक करून सुधारगृहात पाठवलंय. साईभक्त आमच्यासाठी आदरणीय. भिकारी याचा अर्थ भिकारीच जे पोलिसांच्या अहवालात सांगितलं आहे. शिर्डी विधानसभेत मला माझ्या महिला-भगिनी सुरक्षित ठेवण्याचा पूर्ण अधिकार आहे. साई संस्थानला पुन्हा एकदा माझी विनंती, संस्थांच्या प्रसादालयातील आकारलेल्या पैशांचा वापर विकासासाठी आणि शिक्षणासाठी व्हावा. साईभक्तांना हिणवण्याचा प्रयत्न कोणीही करत नाही

# विद्यार्थ्यांनीनो करा अभ्यासाचा संकल्प!

सन २०२५ या नवीन वर्षाचा आज चौथा दिवस आहे. नवीन वर्ष सुरू झाले की प्रत्येकजण जीवनात यशवंत होण्यासाठी नवीन संकल्प करीत असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनात परीक्षा महत्त्वाची असते. त्या आनुषंगाने अभ्यास सुद्धा महत्त्वाचा असतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत असताना आपल्या परीक्षा डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासाचा संकल्प केला पाहिजे. यातच त्यांचे परीक्षेतील यश अवलंबून असते. नवीन वर्ष सुरू झाले की प्रत्येकजण आपला संकल्प करीत असतात. त्यासाठी तो मागील वर्षाच्या चुका सुधारून पुन्हा तशा चुका होणार नाहीत याची काळजी घेत नवीन संकल्प सुरू करीत असतात. जीवनात यशस्वी होण्यासाठी नवा संकल्प करावा लागतो. त्यासाठी आपले उद्दिष्ट ठरवून डोळ्यांसमोर ठेवावे लागते. प्रत्येकाचे उद्दिष्ट वेगवेगळे असले तरी विद्यार्थ्यांचे मुख्य उद्दिष्ट आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे हे असते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास केला पाहिजे. एक दिवस किंवा परीक्षेच्या आदल्या रात्री रात्रभर अभ्यास केला म्हणजे आपल्याला चांगले गुण मिळतील असे नाही. शेवटी आत्मविश्वासाने व प्रसन्न वातावरणामध्ये तीन तास पेपर अचूक सोडवावा लागणार आहे. याची तयारी झाली का? याचे उत्तर विद्यार्थ्यांनी आता शोधत बसण्यापेक्षा जे विद्यार्थी बोर्डाची परीक्षा देणार आहेत त्यांनी नवीन वर्षाचे स्वागत करीत वेळ वाया न घालविता अभ्यासाचा संकल्प करावा. यातच त्यांचे भवितव्य आहे. मागील वर्षाला गुड बाय म्हणत असताना अभ्यासक्रम सुद्धा शिकवून पूर्ण झाला असेल. तेव्हा नवीन वर्षाला वेलकम म्हणत वेळ घालविण्यापेक्षा आतापर्यंतची अभ्यासातली प्रगती लक्षात घेऊन वार्षिक परीक्षेत जास्तीत जास्त गुण कसे मिळतील त्याचा संकल्प करावा. आता हीच वेळ आहे, हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावे. त्यासाठी आतापासून परीक्षा होईपर्यंत आपले आरोग्य सांभाळून वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. म्हणजे वेळेचे नियोजन जरी केले तरी दिवसातील किती तास अभ्यास करणार आहोत त्याचा संकल्प विद्यार्थ्यांना करावा लागेल. यातच त्यांचे यश अवलंबून आहे. त्यासाठी आपली परीक्षेसाठी तयारी किती झाली याचे उत्तर त्यांनी स्वत:ला प्रामाणिकपणे द्यावे. हीच यशाची पायरी आहे. नवीन वर्षाची सुरुवात करीत असताना विद्यार्थ्यांनी इतर संकल्प बाजूला सारून आपल्या भवितव्यासाठी आपले विषय व त्या विषयाच्या अभ्यासक्रमाचा विचार करून अभ्यासाचा संकल्प करावा. त्यासाठी परीक्षा होईपर्यंत मित्र, नातेवाईक व सखा मित्र बनलेला मोबाईल यांना दूर ठेवून अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. त्याचप्रमाणे लिखाणाची सुद्धा नियमित सवय ठेवावी. परीक्षा संपल्यावर पाहुणचार करावा मात्र आता परीक्षा होईपर्यंत पाहुणचाराचा विचार करू नये. काही विद्यार्थी शैक्षणिक वर्ष सुरू झाले की आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे हा संकल्प डोळ्यांसमोर ठेवून नियमित अभ्यास करीत असतात. त्यामुळे ते परीक्षेला हसत हसत सामोरे जावून विशेष श्रेणीत पास होतात. आलीकडे तर १०० टक्के गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण होऊ लागले आहेत. तसेच शाळांचा सुद्धा १०० टक्के निकाल लागतो. यासाठी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून संकल्प केला जातो. तसेच हे यश संकल्पामुळेच शक्य होते. तेव्हा जीवनात यश संपादन करायचे असेल तर मनापासून संकल्प हा अतिशय महत्त्वाचा असतो. जीवनात संकल्पाशिवाय यश संपादन करू शकत नाही. त्यासाठी जिद्द अतिशय महत्त्वाची असते. आता विद्यार्थ्यांनी मागील वर्षातील चुका उजळत बसण्यापेक्षा त्या बाजूला सारून अंतिम परीक्षेची तयारी कशी करता येईल त्या दृष्टिकोनातून संकल्प करावा. तेव्हा विद्यार्थ्यांनी मागील परीक्षेतील आपली प्रगती लक्षात घेऊन अभ्यासाला लागावे. ते सुद्धा परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे सोने करण्यासाठी अभ्यासाचा संकल्प करावा. त्यासाठी वेळेकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. प्रत्येक दिवसाचे नियोजन करून त्याप्रकारे विषयांचे वेळापत्रक तयार करावे लागेल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू नये. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. तेव्हा प्रत्येक विषयाची परीक्षा कधी आणि मध्ये सुट्टी किती दिवस आहे याचा अंदाज घेऊन अभ्यासाला लागावे.महत्त्वाची बाब म्हणजे आता वेळ कमी आहे. अभ्यास अभ्यासक्रमानुसार करावा. त्यानंतर आपली किती तयारी झाली याचा सुद्धा विद्यार्थ्यांनीच विचार केला पाहिजे. आता अवांतर वाचनाकडे जास्त लक्ष देऊ नये याची खबरदारी विद्यार्थ्यांनी घ्यावी. तसेच घरातील टीव्हीपासून चार हात दूर राहावे. पालकांनी सुद्धा मुलांचे भवितव्य ओळखून आपल्या मुलांच्या अभ्यासामध्ये व्यत्यय येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. मुलांच्या परीक्षा होईपर्यंत विशेष कार्यक्रमांपासून दूर राहावे. महत्त्वाची बाब म्हणजे मुलांच्या जेवणामध्ये बदल करू नये. परीक्षा कालावधीत त्याला जे आवडते तेच जेवण द्यावे. शक्यतो बाहेरील पदार्थ खाणे टाळावे. तेव्हा नवीन वर्षाचा आज ४ था दिवस आहे. आता विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवून जीवनात चांगले यश संपादन करण्यासाठी आजपासून परीक्षा संपेपर्यंत आपल्या मनातील ताण तणावावर मात करत अभ्यासाचा संकल्प करायला हवा. हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ६ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## तुलसी शैक्षणिक समूहात एकपात्री नाट्यातून सवित्रीमाईंचे जीवनदर्शन

बीड (प्रतिनिधी) येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी शैक्षणिक समूह, बीड.च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त शनिवार दि.४ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वा.तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड. येथे महाविद्यालयाच्या प्रांगणात स्त्री सन्मान सोहळा व मी सावित्री बोलतेय या एकपात्री विचारनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष,मा. प्रा.प्रदीप रोडे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शक व एकपात्री नाट्याच्या सादरकर्त्या एस.एन.डी.टी.महिला महाविद्यालय, जळगाव च्या प्रा. मीनाक्षी वाघमारे उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. विनोद किर्दक, समर्थ राजयोग चे संपादक, मा. वैभव स्वामी, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा, दीपाताई रोडे, सामाजिक कार्यकर्त्या वाघमारे ताई सह आदींची उपस्थिती होती. या वेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला कर्तुत्वांचा सन्मान करताना प्रा.कल्याणी राजेश शिंदे (चित्रपट व फोटोग्राफी), भावना बिडवे (सौंदर्य प्रसाधन), मा. प्रज्ञा दीपक जमधाडे ( लॅक्मे- प्रोफेशनल मेकअप आर्टिस्ट, बीड. ), कु.अंकिता जाधव( फॅशन डिझायनर),मा. शेख आयेशा ( पत्रकारिता ) यांना सन्मानचिन्ह, धम्म सेवक लक्ष्मणराव रोडे गुरुजी ग्रंथ व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. मी सावित्री बोलतेय या एकपात्री विचारनाट्य प्रयोगाच्या सादरीकरणातून प्रा.मीनाक्षी वाघमारे यांनी सावित्रीमाईचे बालपण ते मृत्यूपर्यंतचा संपूर्ण संघर्षमय जीवनपट दर्शविला. सुस्पष्ट संवाद, डोळ्यात पाणी आणणारा अभिनय, न थकता सावित्रीमाईमध्ये एकरूप होऊन त्यांनी स्त्रीभ्रूणहत्या, महिलांवर होणारे विविध अत्याचार आणि सावित्रीमाई यांनी महिलांसाठी राबविलेले विविध उपक्रम यातील विविध प्रसंगाचे अतिशय प्रभावी सादरीकरण केले. त्यांनी सादर केलेल्या या प्रयोगास प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. अंकुश कोरडे यांनी मानले. यावेळी आयोजक म्हणून तुलसी शैक्षणिक समूहातील तुलसी संगणकशास्त्र महाविद्यालय, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, तुलसी इंग्लिश स्कुल, तुलसी कनिष्ठ महाविद्यालय, तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंग, माता रमाई कॉलेज ऑफ नर्सिंग, बीड. येथील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवारासह शहरातील महिलांची संख्या लक्षणीय होती

## रोज ७००-८०० फोन, अश्लील कमेंट:अंजली दमानिया यांना जीवे मारण्याची धमकी, पंकजा मुंडे-धनंजय मुंडेंवर केले गंभीर आरोप

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोप सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक करण्यात आली. तसेच आरोपींना मदत करणा-या सिद्धार्थ सोनावणे आणि डॉ. संभाजी वायभसे यांनाही अटक करण्यात आली आहे. या सर्व आरोपींना १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या या प्रकरणावरुन विरोधक आक्रमक झाले आहेत. त्यातच आता याप्रकरणी आक्रमक भूमिका घेतलेल्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी नुकतंच पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. मला बीडमधून अनेक धमकीचे फोन येत आहेत. कार्यकर्त्यांकडून आपला प्रचंड मानसिक छळ होत असल्याचा गंभीर आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे.मला सातशे ते आठशे लोकांचे फोन कॉल आले धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्या कार्यकर्त्यांकडून आपला प्रचंड मानसिक छळ होत आहे. बीड जिल्ह्यातून मला अनेकांचे धमकीचे फोन येत आहेत. नरेंद्र सांगळे नावाचा व्यक्ती मला फोन करत आहे. नरेंद्र सांगळे ही व्यक्ती शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देत आहे. गेल्या चार दिवसांपासून मला सातशे ते आठशे लोकांचे फोन कॉल येऊन गेले. दोन दिवसांपूर्वी मी माध्यमांशी बोलताना काही विधानं केली होती. बीडच्या वरिष्ठ पदावर सर्व वंजारी समाजाची लोक आहेत, असं मला अभ्यासातून समजलं होतंङ्क, असे अंजली दमानिया म्हणाल्या. मी कधीही कोणत्याही समाजाविरोधात बोलत नाही दोन दिवसांपूर्वी मी माध्यमांशी बोलताना काही विधानं केली होती. बीडच्या वरिष्ठ पदावर सर्व वंजारी समाजाची लोक आहेत, असं मला अभ्यासातून समजलं होतं. वंजारी समाजाच्या लोकांना मोठ्या प्रमाणात प्रशासनात घेण्यात आलं होतं. काही काळाने त्या सर्वांना बीडमध्ये बलावण्यात आलं. हे विधान कुठेही समाजाविरोधात बोलले नव्हते. मुद्दा हा आहे की मी कधीही कोणत्याही समाजाविरोधात बोलत नाही, तर मी जर आता बोलले तर ते का बोलले?ङ्क असा सवाल अंजली दमानिया यांनी केला. सुनील फड हे धनंजय मुंडे यांचे समर्थक ङ्कनरेंद्र सांगळे यांचा काही वेळापूर्वी मला फोन आला होता. हा माणूस उठसूठ फोन करत सुटलाय. त्यांनी माझा फोननंबर फ ेसबूकवर टाकलाय. तसंच, काही पोस्ट केल्या आहेत. त्यांनी खालच्या दर्जाची भाषा वापरली आहे. सुनील फड हे धनंजय मुंडे यांचे समर्थक आहेत. त्यांच्या सोशल मीडियावर ते समर्थक असल्याचं दिसतंय. म ाझ्याविरोधात त्यांनी अश्लील कॉमेंट्स करायला सुरुवात केली आहे. मला पहिल्या दिवशी ७०० ते ८०० फोन आले. आज चौथा दिवस आहे. मी मॉरिशअसला स्कुबा डायविंगला गेले होते. त्यातील एक फोटो फेसबूकवर टाकून अश्लील कमेंट्स केली. हे सर्व धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते आहेतङ्क, असा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे.

## स्वामी ब्रह्मानंद विद्यालयात रंगला माजी विद्यार्थ्यांचा मेळावा



दैनिक / संदीप शिंदे पिंपरी राजा

शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे विसरून गेले होते. निमित्त होते. स्वामी ब्रह्मानंद माध्यमिक विद्यालय पिंपरी राजा माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे. २०१० ते २०११ इयत्ता दहावीची जवळपास १४ वर्षांत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळावा रविवारी स्वामी ब्रह्मानंद महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राजकारण, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. सकाळी ९ वाजता शाळेतील माजी विद्यार्थी एकत्र आल्यावर सर्वांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत करण्यात आले. पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव आणि स.भु. हायस्कूल पिंपरी राजा या शाळेचे म ाजी विद्यार्थी निवृत्ती पाटील गावंडे कार्यक्रम ाचे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर मुख्याध्यापक दिनेश देशपांडे सर माजी मुख्याध्यापक सुभाष गायकवाड सर राऊत सर काकडे सर वैद्य सर मेश्राम सर साळवे सर कचकुरे सर घोडके रामुळे मॅडम पवार सर दीपक साळवे सर संदीप शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती माजी विद्यार्थी विश्वास घोरपडे जयराज घोरपडे सुकन्या घोरपडे आणि त्यांच्या सहकारी मित्रांनी हा माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला होता. सर्व माजी विद्यार्थी एकत्र आल्यावर सर्वांनी आपला परिचय दिल्यावर त्यावेळेच्या काही गमतीदार आणि काही चांगल्या आठवणींना उजाळा दिला. अनेक विद्यार्थी छत्रपती संभाजीनगर च्या बाहेर असून ते या मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आले होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांचा गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असताना जीवनात यश मिळवले असले तरी त्यामागे शाळेचे संस्कार आहेत, अशी भावना अनेक माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. माजी विद्यार्थी जयराज घोरपडे विश्वास घोरपडे किशोर गोरे राहुल गोरे विश्वास पवार गजानन चौधरी जनार्दन भोसले राजेंद्र गवळी राम बुरुकुल बाळू वाघ अर्जुन, शरद थाले,सुकन्या घोरपडे सुजता बुरुकुल प्रतीक्षा भेरे रूपाली चांगुलपाये कावेरी पवार अंजनाताई आदी विविध क्षेत्रात काम करणारे माजी विद्यार्थी मेळाव्याला उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात निवृत्ती पाटील गावंडे म्हणाले की माजी विद्यार्थ्यांनी शाळेशी आपली नाळ कायम ठेवत शाळेसाठी शाळेच्या भल्यासाठी तन-मन-धनाने शाळेसोबत उभा राहण्याच्या आव्हान माजी विद्यार्थ्यांना केली.

# कृषी प्रदर्शनाला तिसऱ्या दिवशीही अलोट गर्दी

: गेवराई येथे सुरु असलेल्या चार दिवशीय कृषी प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशीही नागरिकांनी कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी अलोट गर्दी पाहायला मिळाली दिनांक ७ जानेवारी मंगळवार पर्यंत हे प्रदर्शन चालू राहणार आहे. आज या प्रदर्शनात भव्य पशु प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये कृषी प्रदर्शनात यामध्ये पंजाबी अश्व, पंढरपुरी म्हैस, लालकंधारी, देवणी गाय, खिल्लार बैल, यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तर प्रामुख्याने सहा किलोचा कोंबडा व







चायना बोकड हे विशेष आकर्षण ठरत आहे. किसान कृषी प्रतिष्ठाणच्या वतीने गेवराई येथे मागील १६ वर्षापासून कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरतील असे अनेक कंपन्यांचे स्टॉल ला गले आहेत. या स्टॉलवर तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले

# बीड जिल्ह्याच्या बाहेरचा पालकमंत्री झालं तर टक्केवारीसाठी दल्ले वाढणार!

### सावे पालकमंत्री होते तेव्हा बीडच्या भाजपा मधील काही कार्यकर्ते दलाल झाले होते

राज्यामध्ये महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर नागपूरला अधिवेशन पार पडले आणि त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. मंत्रिमंडळाचा विस्तार झाला तरी अद्याप पालकमंत्री नियुक्त न केल्याने अवघ्या महाराष्ट्राला याची प्रतीक्षा आहे. महायुतीमध्ये तीन पक्ष एकत्र आले असल्याने त्यांच्यामध्ये पालकमंत्री पदाची वाटणी होण्यास विलंब होत आहे. आता हे काम अंतिम टप्प्यात आली असून यादी तयार झाली असल्याचे बोलले जात आहे. त्यामध्ये बीडचे पालकमंत्री कोण होणार याबाबत मोठी चर्चा घडत आहे. बीड जिल्ह्यातून धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हे दोन कॅबिनेट मंत्री झाले आहेत. यामुळे या दोघांपैकी एकाला पालकमंत्री पद भेटेल असे वाटत होते मात्र जिल्ह्यामध्ये झालेली विपरीत परिस्थिती पाहता या दोघांनाही पालकमंत्री पद भेटणे अवघड जात आहे. त्यात अनेकांनी पालकमंत्री हे बाहेरचेच असावेत अशी मागणी केली आहे. त्यानुसार बाहेरचे पालकमंत्री जिल्ह्यासाठी आले तर ते जिल्ह्यासाठी नुकसानदायकच ठरणार आहे. पालकमंत्री हा जिल्ह्याचा कारभार हाकणारा अत्यंत महत्त्वाचा जबाबदार पदाधिकारी असतो. जिल्ह्याच्या विकासासह जे विविध प्रश्न असतात ते सोडवण्याची जबाबदारी पालकमंत्र्यावर असते. विविध समित्या स्थापन करण्यासाठीही पालकमंत्री लागतात. जर जिल्ह्यातील पालकमंत्री असेल तर जिल्ह्याच्या विकासासाठी आणि सगळेच प्रश्न सोडविण्यासाठी चांगले योगदान देता येते मात्र बाहेरचा व्यक्ती असेल तर जिल्ह्यातील अंतर्गत प्रश्न सोडविणे अवघड जाते. अतुल सावे हे पालकमंत्री असतानाचा अनुभव बीडकरांना चांगला आला आहे. स्वतः च्या पक्षाचा आणि शासकीय कार्यक्रम असेल तरच त्यांची हजेरी असायची याशिवाय त्या काळात टक्केवारी चांगलीच बोकाळली होती

## बीड तालुक्यातील लाडके भाऊ पगाराविना; ट्रेनी शिक्षकांचे मानधन आठवडाभरात द्या - धनंजय गुंदेकर



बीड प्रतिनिधी तालुक्यातील ४२७ ट्रेनी शिक्षकांची पगार त्यांच्या निवडीच्या कालावधी पासून ते आजपर्यंत देत असलेल्या ४ महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण होऊनही झालेली नाही. याबद्दल पाठपुरावा करूनही ट्रेनी शिक्षकांना पगार होत नसल्याने काल जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन देत याबद्दल धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली मागणी करण्यात आली. यावेळी तालुक्यातील शेकडो ट्रेनी शिक्षक उपस्थित होते. काल दिनांक ३ जानेवारी रोजी तालुक्यातील लाडके भाऊ म्हणजेच ट्रेनी शिक्षकांनी धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित येत गटविकास अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी व कौशल्य विकास विभागला निवेदन देत थकलेल्या पगाराची मागणी केली. बीडचे गटशिक्षण अधिकारी खान यांच्या हलगर्जीपणामुळे फक्त बीड तालुक्यातील ट्रेनी शिक्षकांची पगार थकलेली असून याकडे सर्व वरिष्ठांनी लक्ष घालावे अशी विनंती यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली. आठवडाभरात या सर्व ४२७ ट्रेनी शिक्षकांचे मानधन द्यावे असे सामाजिक कार्यकर्ते धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे

# गव्हावर तांबेरा रोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी करा या उपाययोजना -शेती अभ्यासक चिंचवडे यांचा सल्ला

गहू हे महाराष्ट्रातील रब्बी हंगामातील महत्वाचे पिक असून जिरायती आणि बागायती या दोन्ही प्रकारात घेतले जाते. देशात गव्हाची सरासरी उत्पादकता ३ ते ३.५ टन प्रती हेक्टर आहे तर महाराष्ट्रात हीच उत्पादकता १.५ ते २ टनापर्यंत येते. मग उत्पादकतेमध्ये एवढा फरक असण्याची नेमकी कारण काय आणि त्यावर काय उपाययोजना करता येतील हे पाहणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यातील महत्वाच कारण म्हणजे तांबेरा रोग. तर हा तांबेरा नेमका काय आहे, तांबेरा रोग येण्यामागची कारण आणि उपाययोजना बदल सेंद्रिय शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी सविस्तर माहिती सांगितली आहे तर सर्वात आधी पाहूया तांबेरा रोगाची लक्षणे काय असतात तर तांबेरा हा बुरशीजन्य रोग आहे. महाराष्ट्रामध्ये काळा आणि नारंगी तांबेरा हे प्रादुर्भावाचे दोन प्रकार आढळून येतात. काळा तांबेरा पिक ओंबिच्या अवस्थेत असताना दिसून येतो. काळा तांबेराचा प्रादुर्भाव गव्हाचे खोड, पानांचा देठ, ओंबीवर दिसून येतो. पानावर रोगाची लागण होताच पहिल्यांदा हरित द्रव्य नष्ट होऊन पांढरे चट्टे तयार होतात आणि नंतर अनुकूल हवामानात त्या ठिकाणी बुरशीच्या तांबूस रंगाचे युरीडोस्पोर तयार होतात. त्यामध्ये असंख्य युरीडोस्पोर असतात. पिकांची वाढ होताना व हवेतील तापमान जसजसे वाढत जाते तसतसे युरीडोस्पोरचे रुपांतर काळ्या रंगाच्या टेल्यूटोस्पोर मध्य होते. तापमान १४ ते २३ अंश दरम्यान असल्यास तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने होतो. प्रादुर्भाव झाल्यास पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात होते. निम्यापेक्षा जास्त उत्पादनात घट येते. नारंगी तांबेरा हा रोग गव्हाची पाने व देठ यावर दिसून येतो. याची लक्षणे गव्हाच्या रोपावस्थेपासून ते दाने भरेपर्यंत दिसून येतात. रोगाची लागण झाल्यावर गोल आकाराचे पानावर लहान लहान डाग दिसून येतात. कालांतराने पानावर व देठावर गोल आकाराची नारंगी रंगाची पुरळ पाहायला मिळते. हि पुरळ सुरवातीला पानाच्या वरच्या भागावर दिसून येते. कालांतराने पानाच्या दोन्ही भागांवर दिसून येते. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने हवेद्वारे होतो. या रोगग्रस्त पानावरून बोट फिरवल्यास नारंगी रंगाची भुकटी बोटास लागते. १५ ते २० अंश सेल्सिअस तापमान या रोगास मानवते. या रोगाची लागण जानेवारी फेब्रुवारी महिन्यात जास्त पाहायला मिळते. जास्त थंडी





पल्लवी चिंचवडे :
सेंद्रिय शेती अभ्यासक

आणि धुके आले तरच या रोगाचा प्रादुर्भाव होतो. तांबेरा रोग होऊच नये म्हणुन काय उपाययोजना कराव्यात सगळ्यात आधी तांबेरा रोगास प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी. त्यामध्ये एच. डी ४५०२, एच. डी. २१८९, सोनालिका फुले समाधान, नेत्रावती, त्रंबक, एनआयएडब्लू ३४, गोदावरी, पंचवटी यासारख्या वाणांची निवड करता येते. परीसरातील शेतकऱ्यांनी गव्हाची एकच जात न निवडता वेगवेगळ्या जातींची पेरणी करावी. पेरणी करताना बफर झोन मेंटेन करावा जेणेकरून शेजारच्या शेतातील प्रादुर्भावग्रस्त पिकावरील बीजाणू आपल्या शेतात हवेमार्फत उडून येण्याचा धोका टाळता येईल. जिरायती गव्हाची पेरणी ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवाड्यात तर बागायती गव्हाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवाड्यात करावी. संशोधन केंद्राच्या शिफारशीप्रमाणेच पाणी द्यावे. जास्त पाणी दिले तर पिकात सतत ओलावा टिकून राहतो आणि पिकात वाढलेल्या आर्द्रतेमुळे रोगाच्या वाढीस चालना मिळते. वाफसा परिस्थिती कशी राहिल याकडे लक्ष द्यावे. नत्रयुक्त खतांचा वापर शिफारशीपेक्षा अधिक करू नये. ज्या परिसरात जास्त तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होतो तिथे शेताच्या चारही बाजूंनी गव्हापेक्षा उंच वाढणारे पिक लावावे. ते बफर झोन म्हणुन काम करते. हवेमार्फत होण्याऱ्या प्रसारावर काही प्रमाणात का होईना नियंत्रण मिळवता येते. तर एकात्मिक कीड- रोग व्यवस्थापन पद्धतींचा वापर करावा. अगदी नियंत्रण मिळवण्या पलीकडे हा रोग गेल्यास बाजारामध्ये मिळणाऱ्या बुरशीनाशकांचा वापर आपण करू शकतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ६ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## धक्कादायक, नागपूरात तीन वाघ आणि एका बिबट्याचा बर्ड फ्लूने मृत्यू, महाराष्ट्रात अलर्ट

म हाराष्ट्र नागपूरातील गोरेवाडा प्राणी संग्रहालयातील तीन वाघ आणि एका बिबट्याच्या क५छ१ व्हायरसने बळी घेतल्याने खळबळ उडाली आहे. एका वाघाचा मृत्यू २० डिसेंबर रोजी झाला होता. तर अन्य दोघा वाघांचा २३ डिसेंबर रोजी मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नमुने पाठविण्यात आले. आयसीएआर– नॅशनल इंस्टिटयूट ऑफ हाय सिक्युरिटी एनिमल डिसिज येथे नमूने तपासल्यानंतर हे नमूने क५छ१ पॉझिटिव्ह असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर महाराष्ट्रासह सर्वत्र खळबळ उडाली आहे.

व्हायरस कुठून आला ?या प्रयोगशाळेचा अहवाल १ जानेवारी रोजी आला. त्यातून कळले की या प्राण्यांचा मृत्यू क५छ१ व्हायरसने झाल्याचे उघड झाले आहे. त्यानंतर राज्यातील प्राणी संग्रहालयाला अलर्ट जारी करण्यात आला आहे. सध्या अधिकारी या प्राण्यांना संसर्ग कोणाकडून झाला याची तपास करीत आहे.२६ बिबटे आणि १२ वाघ हेल्दीतीन वाघ आणि बिबट्यांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह अहवाल आल्यानंतर प्राणी संग्रहालयातील २६ बिबटे आणि १२ वाघांची चाचणी करण्यात आली. परंतू त्यांच्यात कोणताही विषाणू आढळले नाहीत. या प्राण्यांना झालेला संसर्ग बर्ड फ्लू संक्रमित किंवा कच्चे मांस खाल्याने होत असल्याने झाला असावा असे म्हटले जाते.

# ज्याच्यामध्ये कुटुंब सुधारण्याची नियत त्याच्यात असते समाजकारणाची हिंमत!पुरुषोत्तम खेडेकर




**बीड,/प्रतिनिधी**

बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून देशाचे रस्ते मंत्री आदरणीय नितीन गडकरी होते.या कार्यक्रमाला राज्यभरातून अनेक मान्यवर व्यक्तींची होती,न्यायमूर्ती बी.जी.कोळसे पाटील,कर्नाटकचे आमदार मारुती आण्णा मुळे,माधवराव पाटील शेळगावकर,कवी इंद्रजित भालेराव,गंगाधर बनबरे,शिवश्री विजय घोगरे ,रेखाताई खेडेकर यांच्या सह विविध क्षेत्रातील निवृत्त सनदी अधिकारी यांच्या सह राज्यभरातून अनेक मराठा सेवा संघाचे पदाधिकारी म ोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना खेडेकर साहेब म्हणाले समाजसेवा करण्याचा खरा गुरुमंत्र म्हणजे ज्याला आगोदर आपले घर सुधारता येते तोच समाज सुधारण्याची हिंमत करू शकतो. उद्योगधंदे उभा करायला लाजू नका,अनब पैसे आले तर माजू नका असे आवाहन केले.यावेळी नितीन गडकरी बोलताना म्हणाले,फ पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी इतर समाजाचा द्वेष न करता मराठा सम ाजाचे संघटन करून समाजाला नैतिक दिशा देण्याचे कार्य केले. यावेळी बीड जिल्ह्यातून मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोक ठाकरे,जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे,जिल्हा सचिव प्रा.पंजाबराव येडे,जिल्हाउपाध्यक्ष संतोष माने, तालुकाध्यक्ष अरविंद दुबाले,किरण सावंत,भास्कर निंबाळकर ,लक्ष्मण रेडेकर, जंजिरे बापू,गोविंद कदम यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते!

# धनंजय मुंडे पुण्यात घुसलेत, जमिनीची एवढी भूक का लागली?; जितेंद्र आव्हाड

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर खोचक टीका करताना खळबळजनक दावा केला आहे. ङ्गधनंजय मुंडे बीडपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. ते आता पुण्यात घुसलेत. माझ्याकडे आणखी एक प्रकरण आलंय. ते संभाजीनगरमध्ये पण गेलेत. मुंडे यांना जमिनीची एवढी भूक का लागलीये की सगळ्या जमिनी हव्या आहेतङ्घ, अशी खळबळजनक टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. ङ्गशिवलिंग मोराळे याने अत्यंत फालतू स्टोरी तयार केली आणि माध्यमांना सांगितली. वाल्मिक



कराड याच्यावर गुन्हा दाखल आहे हे याला माहिती नव्हतं का? चौकशी अधिकारी आणि वाल्मिक कराड यांचे फोटो आले. तो अधिकारी काय चौकशी करणार? एक अधिकारी ९ वर्षे पदावर आहे. हे मंत्री धनंजय मुंडे यांच्या आशीर्वादाशिवाय होत नाहीङ्घ, असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला. माझ्या बाजूला एक स्त्री बसली आहे. या शेड्युल कास्टच्या आहेत. त्यांची जमीन राज धनवट याने अडीच एकर खाल्ली. राज धनवट हा धनंजय मुंडे यांचा अत्यंत जवळचा मित्र आहे. बलराज वांजीले पोलीस अधिकारी माझ्याकडे काल आला. त्याने सांगितलं की माझ्यावर चौकशी करताना दबाव आणला. अतिरिक्त महासंचालक असताना संजय सिंघल या वरिष्ठ पोलीस अधिका–याने पत्र दिलं होतं. ९/८/२०२३ रोजी पत्र दिलं होतं. चौकशी करा. मात्र त्या चौकशीचं काय झालं?, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला. एखाद्या आरोपीला जातीचा चेहरा लावणं गंभीरफ धनवट याच्यावर गुन्हा दाखल केला म्हणून १० पोलीस अधिका–यांवर लाचलुचपत विभागाची चौकशी लावली. वाल्मिक कराड हा वंजारी समाजाचा चेहरा नाही. एका आरोपीला समाजाचा चेहरा करणं योग्य नाही. प्रत्येक हिंदूला विचारतो तुम्ही एवढे निष्ठुर होऊ शकता का? बीडमधील टिपराट गुंड वाल्मिक कराड हा काय समाजाचा चेहरा आहे काय?

## मुंबईकरांना मिळणार सर्वत्र मेट्रो प्रवासाचा आनंद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा निर्णय

मुंबईत लोकल प्रवास करणे एक दिव्यच असते. लोकलची संख्या वाढल्यानंतर गर्दी कमी होत नाही. त्यामुळे मुंबईत लोकलप्रमाणे इतर पर्याय तयार केले जात आहे. मुंबईत मेट्रो प्रकल्प सुरु आहे. परंतु मेट्रोचे सर्वात मोठे नेटवर्क दिल्लीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत मेट्रो कनेक्टीव्हीटीसाठी नवीन टारगेट सेट केले आहे. महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएला दरवर्षी ५० किलोम ीटर मेट्रो नेटवर्क सुरु करण्याचे टारगेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. मुंबईत सध्या ५९.१९ किलोमीटर मार्गावर मेट्रो सुरु आहे. तसेच १४३.६५ किलोमीटर मार्गावर काम सुरु आहे. दुसरीकडे दिल्लीत ३५१ किलोमीटर रेल्वे नेटवर्क सुरु झाले आहे. तसेच ६५ किलोमीटर नेटवर्कचे काम सुरु आहे. कामाला उशीर होऊ देऊ नका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवार मेट्रो प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी प्रकल्पांचा कामाला उशीर होऊ देऊ नका, असे स्पष्ट निर्देश त्यांन दिले. त्यांनी अधिका–यांना सांगितले की, काम पूर्ण करण्याची डेडलाइन तयार करा, दरवर्षी ५० किलोमीटर मेट्रो लाईन सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरु झाली पाहिजे. मुंबईतील अनेक मेट्रो प्रकल्प रखडले आहेत. त्यामुळे फडणवीस यांनी मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटीला नवीन डेडलाइन निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.





## राज्यात चिकनगुनियाने हातपाय पसरले; ऐन थंडीत हातपायांना ठणक, रुग्ण संख्येत वाढ

राज्यात चिकनगुनियाने हातपाय पसरले आहे. राज्यात रुग्ण संख्या वाढली आहे. गेल्या सहा वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक ५ हजार ७५७ रुग्ण २०२४ मध्ये सापडले आहेत. ऐन थंडीत नागरिकांच्या हातपायांना ठणक लागली आहे. राज्यातील अनेक शहरात चिकनगुनियाचे रुग्ण वाढले आहे. मुंबईसह अनेक शहरात या रोगाने डोके वर काढले आहे. तर नागपूर येथे सर्वाधिक रुग्ण आढळले आहे.राज्यात चिकुनगुनियाचे रुग्ण वाढले

थंडीचा कडाका पुन्हा वाढला आहे. तर मुंबई सारख्या शहरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे. पालिका क्षेत्रात न्यूमोनिया, चिकनगुनिया आणि विषाणूजन्य आजारात वाढ झाली आहे. गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत चिकनगुनियच्या रुग्ण संख्येत ४० टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर आले आहे. राज्य आरोग्य खात्याने महापालिकेच्या ढिसाळ कारभारावर ताशेरे ओढले आहेत.

## गुन्हेगारी, डॉनगिरी, ब्लॅक धंदे, दोन नबरचे धंदे, तस्करी, खून, मारामारी




गुन्हेगारी, डॉनगिरी, ब्लॅक धंदे, दोन नंबरचे धंदे, तस्करी, खून, मारामारी करणाऱ्या व्यक्तींचा अंत सेम त्यांनीच केलेल्या कृत्याप्रमाणे होतो. वाईट कृतीतून लाटलेली संपत्ती दीर्घाकाल टिकत नाही. त्यामुळे कंडोम सारखे वापर करून आरोपीला फाशी द्या म्हणणाऱ्या नेत्याचा पण पारध चित्रपटातील नेत्या सारखा खून झाला पाहिजे.ही गरीबाची पोरं वापरा त्यांना गुन्हेगारी क्षेत्रात लोटा त्यांच्याकडून खून, लुटालूट, मारामारी, अत्याचार अन्याय, दोन नंबर धंदे वसुली करून घ्या आणि एखादा मोठा गुन्हा झाल्यास अंगलट आल्यास त्यांना फाशी किंवा इनकाऊंटर करायला भाग पाडणे ही खूप जुनी नेत्यांची प्रवृत्ती आहे ही तात्काळ बंद झाली पाहिजे. माय बाप भाऊ बहिणींना विनंती करतो की आपला कसलाच नातेवाईक असल्या राजकीय लोकांच्या संपर्कात असेल, त्याची आकस्मात संपत्ती वाढत असेल, त्याने न कमावता एखादी नवीन गाडी, नवीन घर किंवा लॉटरी लागेल्याप्रमाणे पैसा त्याच्याकडे आला असेल तर तो नक्कीच एखाद्या नेत्याकडे गहाण असणार तो वसुली किंवा वरील प्रमाणे दोन नंबर धंद्यात गुंतला असणार आणि त्याचा शेवट थोड्याच वर्षात वेदनादाई अंत होणार बेमौत तो मारला जाणार हे नक्की. त्यामुळे आपल्या मुलांना अश्या वाईट लोकांपासून दूर ठेवा. पारध चित्रपट पहा नेते सामान्य लोकांची पोरं बाळ वापरून त्यांचा उपयोग संपला की त्यांना संपावतात पण एखादा सिद्धार्थ जाधव तयार होतो आणि तो अश्या नेत्यांना कायमच ठोकतो हे मात्र नक्की. एकंदरीत अश्या प्रकरणाचा शेवट वाईटच होतो,...मा. सम्राट डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर.

# महिला सक्षमीकरणासाठी आर्थिक उन्नती आवश्यक -कुलगुरू इन्द्रमणी

गेवराई । प्रतिनिधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र खामगाव येथे दिनांक ०३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, कृषि विज्ञान केंद्र खामगाव, कृषी विभाग, आत्मा, महिला आर्थिक विकास महामंडळ , उमेद, इफको व धान फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय भव्य महिला शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला. विद्यापीठ स्तरीय महिला शेतकरी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी वनामकृवी परभणीचे मा. कुलगुरू प्रा (डॉ) इन्द्र मणि होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. गिरधारी वाघमारे, संचालक विस्तार शिक्षण वनामकृवी, परभणी हे लाभले होते. श्री सुभाष साळवे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड, श्री सयप्पा गरंडे कृषि विकास अधिकारी बीड, श्री सुखदेव चिंचोलीकर जिल्हा समन्वय अधिकारी माविम,बीड श्री मुरहरी सावंत, ईफको चे जिल्हा प्रतिनिधी श्री सय्यद, श्री डॉ. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. आज झालेल्या कार्यक्रमाच्या सुरवातीस केव्हीके खामगाव येथे डॉ



पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत गाय गोठा शेड चे उद्घाटन संपन्न झाले, तदनंतर आयोजित कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. मुख्य कार्यक्रमाच्या सुरवातीला स्व. वसंतराव नाईक तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. गिरधारी वाघमारे यांनी कार्यक्रमाचा उद्देश प्रतिपादन केला तसेच विस्तार शिक्षण संचालनालय व कृषि विज्ञान केंद्रा मार्फत शेतकऱ्यांसाठी चालणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती देखील उपस्थित शेतकरी महिला तसेच शेतकऱ्यांना दिली. तदनंतर शेतीपूरक व्यवसायांमध्ये उत्तुंग भरारी घेतलेल्या शेतकरी महिलांचा मान्यवरांच्या हस्ते शॉल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्रातिनिधिक स्वरूपात गायीच्या शेणापासून विविध वस्तू तयार करणाऱ्या सौ उमाताई औटी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून यशस्वी उद्योजिका महिला सौ. सिताबाई मोहिते जिजामाता कृषि भूषण पुरस्कार प्राप्त, रामनगर, जालना यांनी त्यांच्या अनुभवाच्या कथनातून महिलांना प्रेरीत केले. तसेच त्यांनी असे प्रतिपादन केले कि महिला या जन्मतः सक्षम असतात फक्त त्यांची त्यांना जाणीव करून घेण्याकरिता विद्यापीठाच्या सहकार्याची गरज असते. उद्योगामध्ये भरारी घेण्यासाठी सातत्य, चिकाटी, मालाची गुणवत्ता टिकवणे महत्त्वाचे असते. त्यांनी महिलांना बाजारपेठेत आपला माल विकण्यासंदर्भात विविध प्रकारचे उदाहरणे देऊन प्रेरित केले. त्याचप्रमाणे तांत्रिक सत्रात महिलांचे काबाड कष्ट कमी करण्यासंदर्भात प्रात्यक्षिकासह विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञानाविषयी डॉ. नीता गायकवाड, केंद्र समन्वयक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ, अ.भा. स. सं.प्र कृषीरत महिला , वनामकृवी परभणी यांनी या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले. माविम चे जिल्हा समन्वय अधिकारी श्री सुखदेव चिंचोलीकर यांनी महिला बचत गटाच्या आर्थीक उन्नतीसाठी ५९ लाखाच्या चेक द्वारे मान्यवरांच्या हस्ते महिला बचत गटांना देण्यात आले. डॉ. शिवाजी पवार यांनी नॅनो युरिया चे महत्व सांगून उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यापीठाचे कुलगुरू मा प्रा डॉ. इन्द्र मणि यांनी आर्थीक उन्नती झाल्याशिवाय महिला सक्षमीकरण होणे अशक्य असल्याचे मत व्यक्त केले. महिला सक्षमीकरण करावयाचे झाले तर महिलांकडे निर्णय प्रधानता, आर्थिक बळ या बाबी महत्वाच्या आहेत. मोठया संख्येने उपस्थित महिलांचे अभिनंदन व कौतुक मा कुलगुरू महोदयांनी केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केव्हीके च्या कार्यक्रम समन्वयक डॉ दिप्ती पाटगावकर यांनी केले तर सूत्रसंचालन विषय विशेषज्ञ डॉ हनुमान गरुड यांनी केले

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com